सं.फौ.ख. क्र. २१६/२०२३
शासण वि. सिध्देश्वर
नि.क्र.११
एम.एच.वाय.ए.१३–०००४२५–२०२३

# न्यायनिर्णय

## (दिनांक २१/०५/२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाचा पुरावा पाहता निर्णयासाठी उपस्थीत मुद्दे व त्यावरील माझा निष्कर्ष पुढीलप्रमाणेः

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय कि, दिनांक १८/०१/२०२३ रोजी सायंकाळी ०७:१५ वाजताच्या सुमारास बसस्टॅड जवळ, दिग्रस ता. दिग्रस, जि.यवतमाळ येथे आरोपीने त्याची दुचाकी क्र. एम.एच/१२/पी.बी./ २५३१ सार्वजनिक मार्गावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे मानवी जिवीतास इजा व धोका होईल अशी रीतीने चालवुन फिर्यादिच्या वाहणास समोरा समोर धडक देऊन त्याच्या वाहणाचे नुकसान केले आणि त्याद्वारे भा.द.वि चे कलम २७९ अंतर्गत शिक्षापात्र अपराध केला? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय कि, उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी आरोपीने उपरोक्त नमुद त्याचे वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवून फिर्यादीच्या वाहणाला | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | समोरासमोर धडक देवून, सदर वाहणाचे रु. ३,०००/–चे नुकसान करुन, आगळीक केली आणि त्याद्वारे भा.द.वि.चे कलम ४२७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | |
| ३. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## :कारणमीमांसा:

**मुद्दा क्रमांक १ व २ करिता:**

**२]** मुद्दा क्र. १ व २ एकमेकांशी संलग्न असल्यामुळे तसेच त्यातील कारणमीमांसा सारखी असल्यामुळे कारणांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी दोन्ही मुद्दे एकंदरीत विचारार्थ घेत आहे.

**३]** आरोपीविरुध्द लावण्या तआलेला कलम २७९ भारतीय दंड विधाननुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध साबित करण्यासाठी अभियोग पक्षाला खालील बाबी सिध्द कराव्या लागतील.

अ. आरोपी हा अपघातातील वाहन चालवित होता,

ब. ते वाहण आरोपी हा सार्वजनिक रस्त्यावर चालवित होता,

क. आरोपी ते वाहन भारधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवित होता,

ड. आरोपीने वाहन चालविणे हे मानवी जिवितास धोका पोहोचविण्या इतपत किंवा त्याद्वारे ईजा पोहोचविण्या इतपत पुरेसे कारणीभुत होते.

४]    आरोपीविरुद्ध दोषारोपीत गुन्हा संशयापलीकडे जाऊन सिद्ध करणेसाठी अभियोग पक्षास हे सिद्ध करणे न्यायोचित आहे की, दिनांक १८/०१/२०२३ रोजी सायंकाळी ०७:१५ वाजताच्या सुमारास बसस्टॅड जवळ, दिग्रस ता. दिग्रस, जि.यवतमाळ येथे आरोपीने त्याची दुचाकी क्र. एम.एच/१२/पी.बी./ २५३१ सार्वजनिक मार्गावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे मानवी जिवीतास इजा व धोका होईल अशा रीतीने चालवुन फिर्यादिच्या वाहणास समोरा समोर धडक दिली तसेच त्यांच्या वाहणाचे रु. ३,०००/-चे नुकसान करुन, आगळीक केली व त्याद्वारे भा.दं.वि. कलम २७९ व ४२७ नुसार दंडनीय अपराध केला.

५]    फौजदारी कायद्याचे वरील नमुद तत्व दृष्टीक्षेपात ठेवून अभियोग पक्षाने एकूण सात साक्षीदारास तपासले आहे. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षदाराच्या पुराव्यात आरोपीविरुद्ध दोषग्राह्य मजकुर आढळून आल्यामुळे आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३१३ (१) (ब) अन्वये जबानी नोंदविण्यात आली. त्यातील मजकुर आरोपीस वाचून दाखवला असता त्यांनी तो मान्य नसल्याचे व त्यांना खोट्या गुन्ह्यात गोवल्याचे कथन केले. बचाव पक्षास त्यांच्या बचावार्थ साक्षीदार तपासण्याची संधी देऊन सुद्धा बचाव पक्षातर्फे कुठलाही साक्षदार तपासण्यात आलेला नाही.

६]    प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे दिनांक १८/०१/२०२३ रोजी सायंकाळी ०७:१५ वाजताच्या सुमारास बसस्टॅड जवळ, दिग्रस ता. दिग्रस, जि.यवतमाळ येथे आरोपीने त्याची दुचाकी क्र. एम.एच/१२/पी.बी./ २५३१ सार्वजनिक मार्गावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे मानवी जिवीतास इजा व धोका होईल अशा रीतीने चालवुन फिर्यादिच्या वाहणास समोरा समोर धडक दिली तसेच त्यांच्या वाहणाचे रु.

३,०००/–चे नुकसान करुन, आगळीक केली. त्यामुळे उपरोक्त बाब हि अभियोग पक्षाने साक्षदारांच्या पुराव्याच्या माध्यमातून संशयापलीकडे सिद्ध करणे अपेक्षित आहे.

**७]** राजकुमार (सा.क्र.१) हा फिर्यादी असून त्यांनी दिलेल्या फिर्यादमुळेचं आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे आरोपीविरुद्धचा दोषारोप गुन्हा सिद्ध करणेसाठी फिर्यादीने त्यांच्या फिर्यादप्रमाणे कथन करणे व फिर्याद सिद्ध करणे अपेक्षित आहे. राजकुमार (सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि. १८.०१.२०२३ रोजी सायंकाळी ०६.३० वाजताच्या सुमारास ते बसने आर्णी वरुण दिग्रस करिता निघाले होते. सदर दिवशी गाडी वळवायची असतांना रोडवर वाहणे असल्यामुळे दुभाजकाजवळ गाडी उभी केली असता चिंचोली वरुण दिग्रस कडे येणारा दुचाकीस्वार भरधाव वेगाने त्याची बुलेट वाहण क्र. एम.एच. १२ पी.बी. २५३१ या निळ्या रंगाच्या वाहणाने त्यांच्या बसला समोरुन चालकाच्या बाजुला कोपऱ्याला येवून धडकला. त्यामुळे त्यांच्या बसचे बंपर चपकून अंदाजे ३ ते ४ हजार रुपयाचे नुकसान झाले. पुराव्यादरम्याण त्यांना फिर्याद व प्रथम छापील खबर अहवाल दाखवली असता त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले. त्यांनी त्याच्या पुराव्याच्या अनुषंगाने (नि.क्र. १२ व १३) सिद्ध केली.

**८]** असे असले तरी त्याच्या उलटतपसणीमध्ये त्यांनी हे मान्य केले आहे की, त्यांच्या विरुध्द सदर न्यायालयात आरोपीने फौ.ख.क्र. ३६४/२०२३ दाखल केले आहे. तसेच त्यांनी त्यांच्या पोलीस बयानात असे कथन केले होते की, *"ते संध्याकाळी ७.१५ वाजताच्या दरम्यान दिग्रसला पोहोचले आणि शिवाजी चौक येथे सवारी उतरविल्यानंतर ते बसस्थानक दिग्रस येथे जात असतांना बस स्थानकाच्याबाहेर डिव्हायडरजवळ त्यांच्या ताब्यातील बस ते स्थानकामध्ये नेण्यासाठी वळवत असतानां तसेच त्यांनी बस अर्धवट*

*वळलेली असतांना दारव्हाकडून एक दुचाकी स्वार त्याच्या ताब्यातील बुलेटने महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाच्या बसचे दोन ते तिन हजार रुपयांचे नुकसान केले."* उपरोक्त कथन राजकुमार (सा.क्र.१) याने त्यांच्या पोलीस बयानात केले आहे. परंतु त्यांचा पुरावा पाहता त्यांनी उपरोक्त कथन त्यांच्या पुराव्यात केल्याचे दिसुन येत नाही. त्याचबरोबर, राजकुमार (सा.क्र.१) याने त्याच्या पुराव्यात घटनेची निश्चित वेळ सुद्धा सांगितली नसल्याचे दिसुन येते.

**९]** याउलट, राजकुमार (सा.क्र.१) याने त्याच्या पुराव्यात *"ते* सायंकाळी ०६.३० वाजताच्या सुमारास ते आर्णी वरुण दिग्रस करीता निघाले होते. दिग्रस येथील बस स्थानकावर गाडी वळवायची असतांना रोडवर वाहणे असल्यामुळे दुभाजकाजवळ गाडी उभी केल्याचे तसेच चिंचोली वरुण दिग्रस कडे येणारा दुचाकीस्वार भरधाव वेगाने त्याच्या निळ्या रंगाची बुलेटने येऊन, बसचे बंपर चपकले". असे कथन केलेले आहे. सदरचे कथन हे राजकुमार (सा.क्र.१) यांनी नव्याने व अधिकचे केलेले कथन आहे. त्यामुळे, सदर साक्षदाराचा एकंदरीत पुरावा पाहता आरोपीच्या निष्काळजीपणामुळे घटना घडली किंवा कसे ही बाब संशयास्पद ठरते. तसेच त्यांच्या पोलीस बयानात व पुराव्यामध्ये भिन्नता तसेच अधिकचे कथन आढळुन येते. सदर साक्षदाराने फिर्याद व पोलीस बयान नुसार त्याचा पुरावा दिला नसून परस्परविरोधी कथन केल्यामुळे माझेमते सदर साक्षदाराचा पुरावा हा संशयास्पद असून आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करणेकामी उपयोग करता येणार नाही. त्यामुळे इतर साक्षदारांचा पुरावा पाहणे माझ्यामते आवश्यक आहे.

**१०]** अभियोग पक्षाने पंच साक्षदार प्रशांत (सा.क्र.२) यांना तपासले त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, ते फिर्यादीस ओळखत असुन घटनेच्या वेळी ते समोरील कँटीनमध्ये चहा घेत होते. घटनेच्यावेळी दुचाकी बुलेट स्वाराने बस वळत असतांना समोरुन धडक दिली. त्यामुळे बसच्या समोरील भाग हा चपकला होता असे कथन करत त्यांनी

नि.क्र. १४ अन्वये घटनास्थळ पंचनामा सिध्द केला. राहुल (सा.क्र.३) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, ते आरोपीस ओळखत असुन घटना घडल्याची तारीख त्यांना आठवत नाही. तसेच ते घटनेच्या वेळी तेथे हजर होते. तसेच पोलीसांनी त्यांना फोन द्वारे घटनेच्या दुसऱ्या दिवशी बसस्टँड समोर बोलावले असल्याचे कथन केले. तपासा दरम्याण त्यांना नि.क्र. १४ वरील घटनस्थळ पंचनामा दाखविण्यात आला असता त्यावर त्याची पंच क्र. २ म्हणुन सही असुन त्यांतील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले.

**११]** याउलट दोन्ही साक्षदारांचा उलटतपास पाहता असे दिसुन येते की, प्रशांत (सा.क्र.२) यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये पंचनाम्यातील मजकुर पोलीसांनी त्यांना वाचून दाखवला नसल्याची बाब मान्य केली आहे. तसेच राहुल (सा.क्र.३) यांनी त्याच्या उलटतपासामध्ये फिर्यादी हा त्याचा नातेवाई असुन पोलीसांनी त्यांना फोन द्वारे बोलावले घेतल्याचे मान्य केले. तसेच सदर साक्षदाराने त्याच्या समक्ष अपघात घडल्याचे त्याच्या सरतपासात कथन केले. परंतु सदर साक्षदारास घटनास्थळावरील वाहणांचा क्रमांक माहिती नसल्याचे मान्य केले. सदर दोन्ही पंच साक्षदारांनी घटनेत फिर्यादीच्या गाडीचे नुकसान झाल्याची किंवा आरोपीला कुठे जखम झाली हे सांगितले नाही. तसेच त्यांनी घटनास्थळावरील दोन्ही गाड्यांचा क्रमांस सुध्दा सांगितला नाही. प्रथम दर्शनी पाहता सदर दोन्ही साक्षदार हे घटनास्थळ पंच साक्षदारांच्या कक्षेतील आहेत. त्यामुळे त्यांनी त्याच्या पुराव्याच्या माध्यमातुन घटनास्थळ सिध्द करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु त्यांनी त्यांच्या बयानात तसे कुठलेही वक्तव्य केले नसुन हे सुध्दा सांगितले नाही की, घटना केव्हा, कुठे व कोणाच्या चुकीमुळे घडली. तसेच आरोपीने त्याची बुलेट हे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालऊन बसला धडक दिल्याचे तसेच बुलेट हे वाहण आरोपी चालवीत असल्याचे कथन केलेले नाही. त्यामुळे सदर दोन्ही साक्षदाराचा पुरावा पाहता माझ्यामते त्यांनी घटनास्थळ

पंचनाम योग्य रित्या सिध्द केला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे पुढील साक्षदार तपासुन पाहणे गरजेचे आहे.

**१२]** अभियोग पक्षाने बिबिचंद (सा.क्र.४) व महेश (सा.क्र.५) या दोन साक्षदारांस तपासले. बिबिचंद (सा.क्र.४) यांनी त्याच्या सरतपासात असे कथन केले की, ते आरोपीस व फिर्यादीस ओळखत नसुन घटना घडल्याची तारीख व वर्ष त्यांना आठवत नसल्याचे कथन केले. सदर साक्षदाराने त्याच्या पुराव्यात पुढे असे कथन केले की, घटना अंदाजे २ वर्षांपुर्वी संध्याकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास, नवीन बसस्टँड जवळ, दारव्हा रोडवर घडली होती. सरकारी बस दिग्रस कडुन बसस्टँडकडे वळत असतांना बुलेट मोटरसायकल येऊन बसच्या चालकाच्या दिशेने येऊन धडक दिली. सदर अपघातात कोणाला लागले तसेच दोन्ही गाड्यांचे क्रमांक त्याला सांगता येत नसुन पोलीसांनी त्यांचे बयान नोंदवले नसल्याचे कथन केले. याउलट सदर साक्षदाराने त्यांच्या उलटतपसामध्ये त्यांनी हे मान्य केले की, पोलीसांनी त्यांची विचारपुस न करता त्यांचे नाव लिुन घेतले व सह्या घेतल्या. तसेच अपघाताच्या वेळी ते दुर उभे असल्यामुळे सदर अपघात हा कोणाच्या चुकीमुळे घडला व सदर अपघातातील दोन्ही वाहनांचा क्रमांक सुध्दा त्यांना सांगता येणार नाही. उपरोक्त साक्षदाराचा पुरावा पाहता असे निदर्शनास येते की, सदर साक्षदार हा प्रत्यक्षदर्शी साक्षदाराच्या यादीमधील असला तरी घटना ही आरोपीच्या चुकीमुळे झाली किंवा कसे हे त्यांला सांगता येत नसल्याचे कथन केले.

**१३]** महेश (सा.क्र.५) यांनी असे कथन केले की, घटना जानेवारी २०२३ मध्ये संध्याकाळी ०६.०० ते ०७.०० वाजताच्या सुमारास नवीन बसस्टँड जवळ, दिग्रस–दारव्हा रोडवर घडली असुन एस.टी. महामंडळाच्या गाडीला धडक दिल्याचे त्यांनी पाहिले होते. धडक एस.टी. च्या कोणत्या बाजुला दिली हे त्यांना आठवत नाही. याउलट त्यांनी त्यांच्या

उलटतपसामध्ये सदर बस कोणत्या गावावरुण कोणत्या गावाला जात होती. तसेच अपघात घडलेल्या दोन्ही वाहनांचा क्रमांक तसेच त्यांचे किती नुकसान झाले हे त्यांना माहिती नसल्याचे मान्य केले. उपरोक्त साक्षदाराचा पुरावा पाहता त्याने त्याच्या सरतपासात घटना ही स्वतः पाहिली असल्याचे कथन केले. परंतु बसच्या कोणत्या बाजुने आरोपीने धडक मारली होती तसेच अपघात घडलेल्या दोन्ही गाड्यांची क्रमांक त्यांना माहिती नसल्याचे मान्य केले. तसेच घटनेची निश्चीत वेळ सुध्दा त्यांनी सांगितलेली नाही. उपरोक्त साक्षदाराचा पुरावा पाहता तो साशांकित स्वतरुपाचा वाटत असुन आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही.

**१४]** अभियोग पक्षाने सुवर्णा (सा.क्र.६) यांना तपासले असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, ते आरोपीस ओळखत असुन घटनेच्या दिवशी त्यांची आर्णी–दिग्रस महामंडळाच्या बस जिचा क्र. एम.एच.४०/८२४५ यावर ड्युटी होती. घटना दि. १८.०१.२०२३ रोजी संध्याकाळी ०७.१५ वाजताच्या सुमारास दिग्रस बसस्टँडजवळ घडली होती. सदर दिवशी त्यांची बस आर्णी कडुन दिग्रस बसस्टँडकडे वळत असतांना बुलेट गाडी क्र. एम.एच.१२/२५३१ चिंचोली मार्ग आली व चालकाच्या बाजुने धडक दिली. घडना घडल्यानंतर आवाज आल्याने सदर साक्षदार व गाडीतील ईतर प्रवाश्यांनी बाहेर येऊन पाहिले असता एका बाजुला बुलेट पडलेली होती. सदर अपघातामुळे बसचे नुकसान झाले होते.

**१५]** सदर साक्षदाराचा उलटतपास घेतला असता त्यामध्ये त्यांनी बसचे नेमके काय नुकसान झाले तसेच बुलेट चालकाचे नाव त्यांना माहिती नसल्याचे व पोलीसांनी प्रत्यक्ष त्यांची विचारपुस केली नसल्याचे मान्य केले. उपरोक्त साक्षदाराचा पुरावा पाहता असे निदर्शनास येते की, त्यांनी त्यांच्या सरतपासात ज्यावेळी घटना घडली त्यावेळी ते बसच्या

आतमध्ये हजर होते. त्यामुळे प्रत्येक्षात घटना घडतांना त्यांनी पाहिले नाही. तसेच सदर घटना ही कोणाच्या चुकीमुळे घडली हे सुध्दा त्यांना सांगता येणार नाही.

**१६]** अभियोग पक्षाने सरतेशेवटी तपासी अंमलदार करतारसिंग (सा.क्र.७) यांना तपासले. सदर साक्षदाराचा पुरावा हा औपचारीक असुन त्यांच्या पुराव्या अन्वये अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा (नि.क्र. १४) केल्याचे सिद्ध केले असले तरी, प्रत्यक्षदर्शी साक्षदारांच्या माध्यमातून अभियोग पक्षाने घटना सिद्ध न केल्यामुळे आरोपींविरुद्ध दोषग्राह्य असे काहीही सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरतो.

**१७]** एकंदरीत पाहता, अभियोग पक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यामार्फत आरोपीने एस.टी. बसला धडक देऊन नुकसान केले हे सिद्ध झालेले नाही. फिर्यादी व साक्षदारांचे परस्परविरोधी व अधिकचे कथन पाहता माझ्यामते कुठल्याही फिर्यादी व साक्षदाराने त्यांची फिर्याद "अक्षर आणि भावानुसार" सिद्ध केलेली नसून त्यास योग्यरीत्या दुजोरा मिळालेला नाही. एकंदरीत तपासात सदर घटना ही आरोपीच्या चुकीमुळे झाली हे सिद्ध झालेले नाही. सोबतच आरोपीच्या बुलेट ने धडक दिली व त्यामुळे एस.टी चे नुकसान झाले हे सुद्धा अभियोग पक्षाने सिद्ध केलेले नाही. त्यामुळे, एकंदरीत पाहता दिनांक १८/०१/२०२३ रोजी सायंकाळी ०७:१५ वाजताच्या सुमारास बसस्टॅड जवळ, दिग्रस ता. दिग्रस, जि.यवतमाळ येथे आरोपीने त्याची दुचाकी क्र. एम.एच/१२/पी.बी./ २५३१ सार्वजनिक मार्गावर भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे मानवी जिवीतास इजा व धोका होईल अशा रीतीने चालवुन फिर्यादिच्या वाहणास समोरा समोर धडक दिली तसेच त्यांच्या वाहणाचे रु. ३,०००/–चे नुकसान करुन, आगळीक केली हे संशयापलीकडे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे, माझ्यामते सदर संशयाचा फायदा आरोपीस देऊन त्यास सबळ पुराव्याअभावी

निर्दोष मुक्त करणे योग्य होईल असे माझे मत नोंदवून **मी मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्रमांक ३ साठी खालील आदेश पारित करतो.**

## :आदेश:

१] आरोपी नामे– सिध्देश्वर बबनराव राऊत यांना कलम २७९ व ४२७ भारतीय दंडविधान संहिता, १८६० खाली शिक्षापात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २५५ (१) अन्वये निर्दोश मुक्त करण्यात येते.

२] आरोपीचे पुर्वीचे जामीनबंधपत्र रद्द करण्यात येते.

३] आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी स्वतःचे रूपये १५०००/– चे बंधपत्र पुनःश्च दाखल करावे.

**[न्यायनिर्णय खुल्या न्यायालय कक्षात घोषित करण्यात आला.]**

SAKHARE MANISHA BALAJI
Digitally signed by SAKHARE MANISHA BALAJI
Date: 2026.05.21 17:23:48 +0530

दिग्रस.

दिनांक: २१.०५.२०२६

**(एम.बी.साखरे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), दिग्रस.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | S.B. Chilkewar |
| Name of the Court | M. B. Sakhare |
| | J.M.F.C. (Court No. 2), Digras. |
| Date of decision | 21.05.2026 |
| Order Signed by P.O. on | 21.05.2026 |
| Order uploaded on | 21.05.2026 |